REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २३ ऑक्टोबर, १९४० | अंक ४३

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या मार्षेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

### "अर्था"चा पुढील अंक

"अर्था"चा ता. ४ नोव्हेंबरचा अंक दिवाळीनिमित्त बंद राहील आणि त्यापुढील अंक ता. ११ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

ता. ३० ऑक्टोबरचा "दिवाळी अंक" ४० पृष्ठांचा निघेल.

## विविध माहिती

### रॉयल आर्मी कोअरमध्यें भरती

रॉयल आर्मी मेडिकल कोअरमध्यें भरती करण्यासाठीं १८ ते ४० वयाच्या अँग्लो इंडियनांचे अर्ज मागविण्यांत आले आहेत. तत्सम ब्रिटिश अधिकाऱ्यांप्रमाणेंच ह्या अधिकाऱ्यांस पगार व भत्ता मिळेल.

### दुकानांतील नोकरांच्या कामाचे तासांवर नियंत्रण

बॉंबे शॉप अॅन्ड एस्टॅब्लिशमेंट्स अॅक्टची अंमलबजावणी १५ नोव्हेंबरपासून सुरू होईल.

### हिंदी शास्त्रीय लेखकाचा सन्मान

लाला गोविंद बिहारी लाल माथुर ह्यांची अमेरिकेंतील नॅशनल असोसिएशन ऑफ सायन्स रायटर्सच्या अध्यक्षस्थानीं निवड झाली आहे.

### मुलांचें स्थलांतर

४ लक्ष, ८९ हजार, म्हणजे लंडनमधील शाळेंतील विद्यार्थ्यांपैकी सुमारें ५६% मुलांस लंडनबाहेर पोचविण्यांत आलें आहे.

### लोणी–अपरिचित चीज

"लोणी ही चीज जर्मनांना अशी अपरिचित वाटली, कीं तें मिळेल तेथें विकत घेऊन जर्मन लोक आइसक्रीमप्रमाणें खात पॅरीसमधील रस्त्यानें हिंडत होते." युरोपांतील अन्नाच्या दुष्काळाचें वर्णन न्यूयॉर्क टाइम्सच्या खास बातमीदारानें केलें आहे, त्यांत वरील मजकूर आहे.

### हिंद–जपान व्यापार मंदावला

जपाननें शक्य तेवढी निर्गत वाढवून आयात कमी करण्याचें धोरण अवलंबिल्याकारणानें हिंदुस्थानचा जपानशीं चालणारा व्यापार मंदावला आहे. हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांमधील व्यापार मात्र वाढत आहे.

### मुंबई प्रांतांतील जन्म–मृत्यु

मुंबई प्रांतांत १९३९ सालीं मृत्यूचें दर हजारीं प्रमाण २७·५५ पडलें. एकूण जन्म ७,७५,५४५ व मृत्यू ४,९४,८८७ झाले. मुंबई प्रांताची लोकसंख्या १ कोटि, ९९ लक्ष आहे.

### पार्लमेंटची आयुर्मर्यादा

ब्रिटिश पार्लमेंटाची आयुर्मर्यादा एक वर्ष वाढविण्यांत आली आहे.

### चलनी नोटांचा कागद

एक रुपयाच्या चलनी नोटांचा सध्याचा कागद चांगला नाहीं. अधिक चांगल्या कागदावर नोटा काढण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत आहे.

### स्वस्त वैमानिक प्रवास

टाटा एअरवेजनीं मुंबई ते दिल्ली वैमानिक प्रवासाचा दर २५% नें उतरविण्याचें ठरविलें आहे.

### ईस्टर्न ग्रुप कॉन्फरन्स

वरील परिषदेचें २५ ऑक्टोबर रोजीं व्हाइसरॉय उद्घाटन करणार आहेत.

### साखर

शिकलेल्या व सुधारलेल्या लोकांत साखरेचा खप अतिशय मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. पूर्वी साखर महाग असल्यामुळें ती बेतानें उपयोगांत आणली जात असे; आतां ती स्वस्त असल्यामुळें खाण्यांत अधिक येते. निसर्गजन्य साखरेऐवजीं कृत्रिम साखर जरूरीपेक्षा अधिक खाल्ली गेल्यामुळें अपाय जरी प्रत्यक्ष झाला नाहीं, तरी ती अनावश्यक असते.

### आत्महत्या

जर्मनी वगळून बाकीच्या सबंध युरोपांत जितक्या आत्महत्या होतात तितक्या एकट्या जर्मनींत होतात.

### मधमाशांचा युद्धांत उपयोग

गेल्या महायुद्धामध्यें टांगानिका येथें ब्रिटिशांविरुद्ध मधमाशांचा उपयोग जर्मनांनीं केला. ह्याची माहिती एका ब्रिटिश साप्ताहिकाच्या ताज्या अंकांत आली आहे. ब्रिटिश सैनिकांसाठीं दारूगोळा व इतर सामान ज्या रस्त्यानें जावयाचें त्याच्या दुतर्फा रस्त्यांवरील झाडांवर जर्मन आफ्रिकेंतील तद्देशीय सैनिकांनीं मधमाशांचीं पोळीं आणून बांधलीं व झुडपाआड एका ड्रायसेल बॅटरीशीं तीं जोडलीं. सामान व दारूगोळा येतांना दिसताच ह्या माशा विजेचा करंट सोडून उठवण्यांत आल्या व त्यामुळें ब्रिटिशांचीं लॅरीं, घोडे, बैल हे सर्व उधळले गेले. माणसें हालहाल होऊन मेलीं. नंतर जर्मनांनीं माशा परत पिटाळल्या व ब्रिटिशांचा दारूगोळा वगैरे हस्तगत केला. अशा प्रकारची ही विस्मयकारक कथा आहे.

### मनुष्याची उंची

मनुष्याच्या उंचीची जागतिक सरासरी ५ फूट ५½ इंच आहे. युरोपांतील, सर्वांत उंच लोक म्हणजे स्कॉच लोक होत. त्यांची सरासरी उंची ५ फूट ८ इंच भरते. त्यांचे खालोखाल आयरिश व इंग्लिश लोक येतात. रशियन मनुष्याची सरासरी उंची ५ फूट, ६ इंचांपेक्षां थोडी अधिक असते. जर्मन मनुष्य ५ फूट, ६१⁄₁₀ इंच भरतो.

### बहामा

ड्यूक ऑफ विंडसर म्हणजे माजी आठवे एडवर्ड ह्यांची बहामाचे गव्हर्नर म्हणून नेमणूक झाल्यापासून त्या बेटांविषयीं जिज्ञासा लोकांत निर्माण झाली आहे. बहामांतील बहुसंख्य वस्ति निग्रो लोकांची आहे. सुमारें तीन हजार बेटांचा बहामांत समावेश होतो. त्यांपैकीं फक्त विसामध्येंच वस्ती आहे. ह्या बेटांवर पाऊल टाकणारा पहिला श्वेतवर्णीय मनुष्य म्हणजे कोलंबस होय.

### मिनिटास १०० ते १५० शब्द

अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांच्या बोलण्याचा वेग दर मिनिटास १०० ते १५० शब्द इतका आहे.

### दारूबंदीमुळें बेकार झालेल्यांची सोय

दारूबंदीमुळें बेकार झालेल्या तरुणांच्या पोटापाण्याची सोय करण्यासाठीं मुंबई सरकारनें काहीं तरुण निरनिराळ्या धंद्यांचें शिक्षण घेण्यासाठीं सरकारी खर्चानें निरनिराळ्या शिक्षणसंस्थांतून पाठविले आहेत. शिवणकलेचें शिक्षण घेण्यासाठीं सरकारनें एकंदर १२ विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांस दादरकर टेलरिंग कॉलेजमध्यें पाठविले आहे. ह्या सर्व विद्यार्थ्यांच्या फीचा, सामानाचा व राहण्याजेवण्याचा सर्व खर्च मुंबई सरकारकडून होणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५०६ | लुटारूपणा—बँके को. कार्टली | |
| २ युद्धाच्या अलीकडील हालचाली ... ... | ५०७ | ५ युद्धपरिस्थिति आणि स्वदेशी उद्योगधंदे व व्यापार... | ५१० |
| ३ युद्धपरिस्थिति आणि विमा-व्यवसाय ... | ५०८ | ६ ओरिएंटलचें मूल्यमापन | ५११ |
| ४ स्फुट विचार ... | ५०९ | ७ चालू युद्ध टळलें असतें काय ? ... ... | ५११ |
| शेतमालाच्या विक्रीची नियमात्मक व्यवस्था— जर्मनीचा पद्धतशीर | | ८ सहकारी संस्थांचे अहवाल | ५१२ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ५१५ |



# अर्थ

बुधवार, ता. २३ ऑक्टोबर, १९४०


## युद्धाच्या अलीकडील हालचाली

युद्धाच्या अलीकडील रागरंगाचे बाबतींत तीन–चार महत्त्वाच्या बाबी नमूद करतां येतील. पहिली गोष्ट डोळ्यांत भरते ती ब्रिटिश विमानांचा जर्मनीवरील उड्डाणांचा वाढता पराक्रम ही होय. हिटलरच्या लढाईच्या डावपेचांचा मुख्य भाग लंडनवरील नियोजित स्वारीसंबंधांत होता. बेल्जम आणि फ्रान्स ह्या देशांवर ताबा प्रस्थापित झाला कीं तेथें उपयोगांत आणलेल्या युक्तीनें इंग्लंडवर स्वारी करून तो देश क्रमाक्रमानें पादाक्रांत करावयाचा हा हिटलरचा उद्देश होता आणि तो त्यानें उघड बोलूनहि दाखवला होता. अष्टौप्रहर लढाऊ विमानें इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांवर पाठवून संधि सापडेल तेथें बाँब टाकावयाचे आणि अशा रीतीनें ब्रिटिश जनतेस घाबरवून सोडावयाचें ह्या हिटलरी योजनेस यश आलेलें नाहीं. जर्मन बाँबच्या योगानें लंडन आणि इतर कित्येक शहरें येथें नासधूस व क्वचित प्राणहानी झाली असली तरी ब्रिटिश जनता व सरकार ह्यांनीं जर्मनीच्या हवाईहल्ल्यांस मुळींच भीक घातलेली नाहीं. त्यांनीं यत्किंचितहि डगमगून न जातां ब्रिटिश लोक शत्रूच्या विध्वंसक हल्ल्यास धिमेपणानें तोंड देत आहेत. विमानांच्या ह्या स्वाऱ्यांत जर्मनीच्या शस्त्रास्त्रांचा व वैमानिकांचा प्रत्यहीं सपाट्यानें नाश होत आहे. या रीतीनें हिटलरच्या युद्धयोजनेचा हा भाग अयशस्वी ठरला आहे. ह्याचें प्रमुख कारण ब्रिटिश विमानांचा, शत्रूनें चालविलेली फ्रेंच किनाऱ्यावरील हल्ल्याची व स्वारीची तयारी उधळून लावण्याचा अविरत चालवलेला सपाटा हें आहे. हॉलंड, बेल्जम व फ्रान्स ह्यांचे किनारे हातीं आल्यानें इंग्लंडवरील योजलेल्या स्वारीचा कार्यक्रम सुकर होईल ही जर्मन सेनानींची अपेक्षा विफल झाली आहे.

इंग्लंडवरील स्वारीचा आपला नाद हिटलरनें सोडून दिला आहे ह्या कल्पनेनें ब्रिटिश सेनानी व मुत्सद्दी गैरसावध मात्र नाहींत ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. जर्मनीची राजधानी व इतर औद्योगिक महत्त्वाचीं ठिकाणें ह्यांवर ब्रिटिश विमानांनीं सारखे हल्ले चढवून शत्रूवर बाजू उलटवली आहे. शत्रूचे लढाऊ सामुग्रीचे कारखाने, लढाऊ मालाची वहातुक करण्याचीं साधनें, तेलाचे साठे, गोद्या इत्यादींवर ब्रिटिश बाँबचा वर्षाव होऊं लागल्यानें हिटलर व त्याचे सहकारी ह्यांची तारांबळ उडाली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आपल्या दलांची चढाई मंद होऊन उलट, ब्रिटिश वैमानिकांच्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्याची पाळी जर्मन जनतेवर आली आहे. ह्या योगानें जर्मन सैन्याची प्रगति अबाधित होत रहाण्याचा त्या जनतेचा विश्वास ढासळला आहे. ह्या परिस्थितींत हिटलर आपल्या लोकांस आशाजनक बातम्या कोणत्या सांगणार ? हॉलंड ते फ्रेंच किनाऱ्याचा दक्षिण भाग येथें जर्मनांनीं चालवलेली चढाईची सर्व तयारी उधळून लावण्यांत येत आहे. इंग्लंडवरील हल्ल्यांत जर्मनीचीं विमानें नाश पावत आहेत आणि प्रत्यक्ष जर्मन प्रदेशांत ब्रिटिश बाँब लढाऊ साधनांचा विध्वंस करीत आहेत. ह्यावरून इंग्लंडच्या बाजूची हिटलरची युद्धयोजना फसली आहे ह्यांत शंका उरत नाहीं. तथापि, वर म्हटल्याप्रमाणें ब्रिटिश सेनानींनीं आपली सावधगिरी यत्किंचितहि ढिली होऊं दिलेली नाहीं. उलट, जर्मनीवर आपल्या विमानांचे हल्ले चालले आहेत, त्यांचे योगानेंच शत्रूच्या योजनांस व्यत्यय आलेला आहे, ह्याची त्यास उत्कृष्ट जाणीव आहे. ब्रिटिश आरमार आणि विमानें ह्यांचें सहकार्य जर्मनीच्या लढाऊ हालचालींस शह देण्याचे कामीं सर्व बाजूंनीं चाललें आहे तें ह्याच कारणांमुळें होय.

भूमध्य समुद्र आणि आफ्रिका ह्यांचे बाजूस हिटलरच्या दोस्ताचीहि प्रगति अलीकडे कुंठित झाल्यानें त्यानें मुसलोनीशीं नुकतेंच सल्लत करून पुढील डावपेचांची योजना आखली असावी. भूमध्य समुद्रांत इटालिअन आरमारास तोंड काढण्याची सोय नाहीं. ब्रिटिश आरमारानें मधून मधून इटालिअन लढाऊ जहाजांचा समाचार घेण्याचा क्रम ठेवला आहे. त्याचप्रमाणें, ब्रिटिश वैमानिक दलानें आफ्रिकेंतलीं इटालिअन बंदरें व इटालिअन फौजेच्या योजना ह्यांचेवर हल्ले चढवण्याचा क्रम चालू ठेवला आहे, ह्याचा परिणाम मुसोलिनीवर झालेला स्पष्ट दिसत आहे. ह्या स्थितींत युद्धास नवें तोंड फोडण्याचा डाव हिटलरनें टाकला आहे. त्यांतलें पहिलें पाऊल म्हटलें म्हणजे रुमेनियांत जर्मन फौजांची चाल करून तो देश जवळ जवळ आपल्या कह्यांत आणण्याचा केलेला प्रयत्न हें आहे. बाल्कन्समध्यें जर्मनीचें वर्चस्व स्थापण्याच्या ह्या डावपेचांचे परिणाम दीर्घगामी होणार आहेत, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियास जर्मनीची बाल्कन्समधील चढाई पसंत पडणार नाहीं आणि रुमानिया काबीज करून कॉनस्टंझा बंदरांत तळ देण्याचा हिटलरचा उद्देश त्याच्या गळीं उतरणें अवघड आहे. म्हणून ह्या बाबतींत रशियाची समजूत घालण्याची खटपट जर्मनीनें चालवली आहे. तसेंच, तुर्कस्तान जर्मनीच्या वरील हालचाली म्हणजे आपल्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याची पूर्वतयारी आहे असें समजल्यावांचून रहाणार नाहीं. स्पेननें जिब्राल्टरच्या बाजूस गडबड करावी अशी कारवाई हिटलरनें चालवली आहे, पण जनरल फ्रँकोनें तिला पाठिंबा दिला आहे असें वाटत नाहीं.

## युद्धपरिस्थिति आणि विमाव्यवसाय

### ग्रेटब्रिटनमधील विमाकंपन्यांवरील परिणाम

१९३९ सालांतील ग्रेटब्रिटनमधील विमाकंपन्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. त्यावरून ब्रिटिश कंपन्यांस तें वर्ष १९३८ चे मानानें चांगलें गेलें असल्याचें दिसत नाहीं. युद्धाचे चारच महिने १९३९ मध्यें समाविष्ट आहेत. आगीच्या व अपघाताच्या विम्यांत युद्धविषयक नुकसानीचा अंतर्भाव होत नसल्यानें विमा-व्यवसायावर अधिक प्रतिकूल परिणाम होणें शक्य नव्हतें. ब्रिटिश कंपन्यांचें आगीच्या व अपघाताच्या विम्याचें काम युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव न मिळालेल्या देशांतच चालू आहे. ग्रेट-ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य व अमेरिका येथेंच त्यांचें विशेष काम चालतें; युरोपांत नाहीं. तथापि, युरोपांतील कामांत १९३९ सालीं बरीच घट झाली व १९४० सालीं ती आणखी होईल.

### आगीचा विमा

आगीच्या विम्याच्या हप्त्यांचें उत्पन्न समाधानकारक झालें, युद्धविषयक वस्तूंच्या उत्पादनांत वाढ होऊन त्यांच्या विम्याचें कामहि वाढलें. युरोपखेरीज इतरत्र हप्त्यांचें उत्पन्न ठीक मिळालें व त्यांत नफाहि झाला, परंतु ऑस्ट्रेलियांतील आगीमुळें उत्पन्ना-पेक्षा खर्च तेथें अधिक आला. अमेरिकेंतील अनुभव विशेष चांगला आला नाहीं. क्लेम्सचें प्रमाण गेलीं कांहीं वर्षें उतरत गेल्याकारणानें हप्त्यांचे दरहि कमी करण्यांत आले आहेत, परंतु खर्चांत मात्र एकसारखी वाढ होत आहे. विमाकंपन्यांतील परस्पर स्पर्धेमुळें कमिशनचे दर चढले आहेत त्याचा हा परिणाम आहे.

### अपघाताचा विमा

अपघाताच्या विम्याचे कामांतील प्रगति अखंड चालू राहिली. रात्रीचे वेळीं रस्त्यांत अंधकार ठेवण्यांत येत असल्यामुळें मोटारींच्या अपघातांत वाढ होऊन त्यामुळें क्लेम्सहि अधिक यावे लागले. युद्धामुळें खासगी मालकीच्या मोटारी कमी झाल्या तथापि परदेशांतून अधिक काम मिळालें.

### आगबोटींचा विमा

आगबोटींच्या विम्याचे बाबतींत बरीच अनिश्चितता उत्पन्न झाली. युद्धविषयक धोक्याच्या संरक्षणासाठी हप्त्यांत पुष्कळ वाढ झाली असली, तरी हे दर किफायतशीर ठरतात किंवा नाहीं, हें अद्याप समजून आलेलें नाहीं. १९१४–१८ च्या युद्धांत आग-बोटींच्या विम्याचे धंद्याची चलती झाली; चालू युद्धाचे वेळीं काय होतें हें अनिश्चित आहे.

### आयुर्विमा

आयुर्विम्याचे कामांत बरीच घट दिसून आली. आयुर्विम्याच्या पॉलिसी बहुतेक सर्व दीर्घ मुदतीच्या असतात व विमेदारास दिलेलें त्यांतील युद्धविषयक धोक्याचें संरक्षण कंपन्यांस काढून घेतां येत नाहीं. कंपन्यांस त्याबाबतचे क्लेम्स भागविण्यास बराच खर्च येण्याचा संभव दिसतो. व्याजाचे दर चढूं न देण्याचें सरकारी धोरण व करांतील वाढ ह्यामुळें विमाकंपन्यांचें उत्पन्न घटलें आहे. लाइफ फंड पुरेसा राहण्यास त्यावर व्याज मिळत राहणें आवश्यक असतें व व्याजाचा दर कांहीं किमान दराचे वर गेल्याविना त्यांतून रिझर्व्ह निर्माण होण्यास वाव रहात नाहीं. ब्रिटिश आयुर्विमा कंपन्यांजवळ गुप्त व प्रकट मोठे रिझर्व्ह आहेत. १९३८ चे मानानें १९३९ सालीं आयुर्विम्याचें काम २५% कमी झालें. सप्टेंबर १९३९ पर्यंत कांहीं कंपन्यांस १९३८ चे पेक्षांहि काम अधिक मिळत चाललें होतें, परंतु नंतर कांहीं काळ नवीन काम जवळ जवळ बंद पडलें. कांहीं वर्षांपूर्वीच्या मानानें १९३९ मधील कामाचे आकडे चांगले दिसले, तरी १९४० मधील कामाच्या आकड्यांवर युद्धाचा परिणाम तीव्रतेनें झालेला आढळेल.

हप्त्यांचे दर ठरवितांना विमाकंपन्या कांहीं विवक्षित व्याजाचा दर गृहीत धरतात, परंतु १९३९ मध्यें प्रत्यक्ष पडलेला दर त्यापेक्षां पुष्कळच कमी आहे. मूल्यमापनांत गृहीत धरलेल्या दरापेक्षा अद्याप चांगल्या दरानें व्याज पडत असलें तरी पूर्वी गुंतविलेले पैसे रिकामे होऊन ते पुनः गुंतविण्याची वेळ आली म्हणजे व्याजाच्या उत्पन्नांत आणखी घट झालेली आढळेल. कंपन्यांचे जवळ प्रचंड रिझर्व्ह आहेत, त्यांचा ह्यावेळीं चांगला उपयोग होईल. अपेक्षेप्रमाणें सरकारी कर्जरोख्यांच्या किंमतींत घट झाली नाहीं. युद्धामुळें मृत्यूंची संख्या वाढून क्लेम्स अधिक यावे लागतील, ते अर्थातच टाळतां येणार नाहींत. सप्टेंबर, १९३९ पूर्वीच्या सर्व पॉलिसींतील अटींत युद्धविषयक मृत्यूचा धोका समाविष्ट आहे.

### किरकोळ अडचणी

बहुतेक कंपन्यांनीं आपल्या कागदपत्रांचें स्थलांतर केलें आहे. कंपन्यांस थोड्या नोकरांकडून सर्व कामें करून घ्यावीं लागतात. मालाचे साठ्याच्या विम्याचें काम नफ्यास वाव न मिळतां त्यांस करावें लागतें. ह्या सर्व अडचणींतून ब्रिटिश विमाकंपन्यांनीं आपलें कार्य चालू ठेवलें आहे. त्यांच्या जगभर पसरलेल्या कामाच्या जाळ्यामुळें ग्रेटब्रिटनचा अदृश्य रीतीनें निर्गत व्यापार चालू रहातो ही गोष्ट सध्या सारख्या काळांत तर विशेषच महत्त्वाची आहे.

### ब्रिटिश आयुर्विमा कंपन्या

नवीन मिळालेलें काम

| वर्ष | पॉलिसीची संख्या | पॉलिसीची रकम (कोटि रु.) | सिंगल प्रीमियम (कोटि रु.) | रिन्यूअलचें वार्षिक उत्पन्न (कोटि रु.) |
|---|---|---|---|---|
| १९३७ | ६,२४,१२२ | ३१० | ६२ | १३½ |
| १९३८ | ५,८५,००० | ३६८ | ५२ | १२½ |
| १९३९ | ४,६४,००० | २८० | ३६ | ९½ |

---

### हिंदी राज्यघटनेवरील निबंधास बक्षिस

पेंपायर युनिव्हर्सिटीज ब्यूरोनें, हिंदी पदवीधरांनीं हिंदी राज्य-घटनेवर लिहिलेल्या तीन उत्कृष्ट निबंधांस ५० पौंड, २० पौंड व २० पौंड अशा किंमतीचीं बक्षिसें द्यावयाचें ठरवलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हिंदी राज्यघटनेविषयींच्या प्रश्नांच्या अभ्या-सास उत्तेजन देणें हा ह्या बक्षिसांचा उद्देश आहे. सर्व हिंदी जमा-तींचें सहकार्य घ्यावें ह्या दृष्टीनें लोकशाही पद्धतीचीं कायदेमंडळें व कार्यकारी मंडळें ह्यांची व्यवस्था कशी करावी हा मुख्य प्रति-पाद्य विषय आहे. प्रत्येक हिंदी विश्वविद्यालयांत उत्तम ठरलेले निबंध लंडनला पाठविले जातील आणि तेथें परीक्षकांची एक समिति बक्षिसास लायक असे निबंध निवडतील.

## स्फुट विचार

### शेतमालाच्या विक्रीची नियमात्मक व्यवस्था

मुंबईच्या कायदेमंडळानें शेतीच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था नियमात्मक पद्धतीनें होण्यासाठी एक स्वतंत्र कायदा केला आहे. त्या कायद्यासाठी सरकारनें नियम करावयाचे होते त्यांचा मसुदा आतां प्रसिद्ध झाला आहे. त्यांचे संबंधानें लोकांचें म्हणणें कळावें म्हणून नोव्हेंबर अखेर मुदत देण्यांत आली आहे. नियमांचे बाबतींत कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्यासाठी सरकारनें ही संधि दिली आहे. शेतीच्या मालाची विक्री व्यवस्थितपणानें होऊन शेतकऱ्यांस योग्य भाव मिळावा आणि या संबंधांत त्यांच्या सोयींकडे लक्ष दिलें जावें हा सरकारी कायद्याचा व त्या खालील नियमांचा उद्देश आहे. विशिष्ट मालाच्या विक्रीच्या बाजारांचीं क्षेत्रें निश्चित करण्यांत येतील आणि त्यांची व्यवस्था पहाण्यासाठी कमिट्या निवडल्या जातील. पहिल्या कमिट्यांच्या सभासदांची नेमणूक जिल्ह्यांचे कलेक्टर करतील; पुढें ते शेतकरी, व्यापारी व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्या गटांकडून निवडले जातील. प्रत्येक बाजाराच्या क्षेत्रांत व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संस्था व दरवर्षी २०- रुपये सारा भरणारे शेतकरी व त्यांचीं कुळें हा शेतकऱ्यांचा निवडणूक गट होईल. बाजारांत धंदा करण्याचा परवाना असणारे व बाजारकमिटीनें मान्य केलेले व्यापारी व्यापाऱ्यांच्या गटांत येतील. निवडणुकींतील मतदारांच्या याद्या कलेक्टर तयार करतील. व्यापाऱ्यांकडून बाजारांत व्यवहार करण्याबद्दल देण्यांत येणाऱ्या परवान्याच्या फीचें उत्पन्न होईल त्यांतून सरकारी देणें प्रथम भागवण्यांत येऊन बाकीच्या रकमेचा विनियोग बाजाराचा उपयोग करणारांच्या सोयी व आरोग्य ह्यांसाठी केला जाईल. विकावयाच्या मालाचे नमुने बाजार कमिट्या लोकांच्या माहितीसाठी ठेवतील आणि त्यांच्या किंमतींच्या याद्याहि पुरवतील. "बॉंबे ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट्स ॲक्टा" खाली केलेल्या नियमांच्या मसुद्यांचें स्वरूप वरीलप्रमाणें आहे. त्याबाबत कोणास सूचना करावयाच्या असतील तर त्या सरकारकडे मुदतींत पाठवण्यांत याव्यात.

---

### जर्मनीचा पद्धतशीर लुटारूपणा

'सध्याचें युद्ध चालू होण्यापूर्वी जर्मनीनें शेजारच्या राष्ट्रांशीं असे व्यापारी करार केले होते कीं त्यांचे योगानें त्या राष्ट्रांच्या कच्च्या मालाच्या मोबदल्यांत त्यांच्या गळ्यांत जर्मनीचा पक्का माल नको असतांहि पडावा. ह्या कृषिप्रधान राष्ट्रांस आपला कच्चा व शेतीचा माल जर्मनी घेत आहे हें पाहून समाधान वाटे. परंतु त्या व्यापारांत अशी खुबी होती कीं, ह्या कच्च्या मालाच्या किंमती त्यांच्या खात्यांवर जर्मनी मांडीत असे आणि त्यांची फेड आपला विशिष्ट जातींचा पक्का माल त्यांचेवर लादून करीत असे. डॉ. शास्ट यांच्या नेतृत्वाखालीं ही हिकमत व्यवस्थित रीतीनें लढवण्यांत येत असे. आतां नॉर्वे, हॉलंड, डेन्मार्क, बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत जर्मनसत्ताधाऱ्यांनीं आपला तळ दिला आहे आणि त्यांच्या आर्थिक साधनांचा उपयोग स्वार्थासाठी करून घेण्याची सुवर्ण संधि ते थोडीच वायां जाऊं देणार आहेत? जर्मनीस लढाऊ व खाण्याच्या उपयोगाचे जिन्नस ते त्या देशांत वाटेल त्याप्रमाणें विकत घेत आहेत. वरकांति हा खरेदीचा व्यवहार सरळ व्यापार आहे आणि विकत घेतलेल्या मालाची किंमतहि रोखीनें देण्यांत येते. पण ह्या व्यवहारांत जिंकलेल्या देशांस लुबाडण्याची युक्ति अशी आहे कीं त्यांमध्यें राष्ट्रीय बँकांकडून कागदी चलन मोठ्या प्रमाणावर प्रचलित करावयाचें आणि त्याच्या जर्मन चलनाशीं हुंडणावळीचा दर असा ठरवावयाचा कीं, त्याचे योगानें थोड्या जर्मन सट्रश मार्क्सना पुष्कळ माल विकत मिळावा. जित राष्ट्रांमध्यें जर्मन-चलनांत किंमती दिल्या तरीहि त्यांच्या मोबदल्यांत तेथील व्यापाऱ्यांस स्थानिक चलनच राष्ट्रीय बँकांकडून मिळणार. वरून दिसायला चलनाची ही व्यवस्था न्याय्य व सरळ वाटते. पण त्यांत जितराष्ट्रांच्या संपत्तीची लूट आहे. त्या राष्ट्रांचें जर्मनीनें द्यावयाचें देणें जरूर तेथें कागदावर रहाणार आणि युद्धसमाप्तीनंतर त्याची फेड होणार. ह्यांत जितराष्ट्रांच्या हातीं काय लागणार हें दिसतेंच आहे. जर्मनीच्या युक्त्या त्यांच्या लक्षांत येत नसतील असें नाहीं. आतां त्यांचे योगानें त्यांतील जनतेमध्यें असमाधान पसरलेलें नाहीं असें नाहीं. परंतु आज नाइलाज म्हणून त्यांनीं जर्मनीशीं व्यापारी व्यवहार चालू ठेवले आहेत. प्रसंग येतांच ह्या असमाधानाचा स्फोट झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा सप्टेंबर, १९४० चा अंक प्रसिद्ध झाला आहे. "रिझर्व्ह बँकेनें सहकारी संस्थांच्या पैशांच्या वर्गावर्गीस असलेली सवलत काढून घेतली आहे. त्यामुळें, सहकारी संस्था व बँका ह्यांचेमधील बँकिंगविषयक कार्यांतील फरक कायम राखण्याचें प्रयोजन उरणार नाहीं; तेव्हां सहकारी संस्थांच्या बँकिंगचे व्यवहारावरील नियंत्रणें तरी दूर होणें जरूर आहे" असें त्रैमासिकांतील अग्रलेखांत प्रतिपादन केलेलें आहे. मद्रास को. चौकशी कमिटीच्या रिपोर्टचें परीक्षण प्रो. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. खरेदीच्या किंमतींनें मालाची विक्री करणाऱ्या दुकानांसंबंधीं मि. क्लार्क ह्यांनीं लेख लिहिला आहे त्यांत सुरत येथील योजनेची माहिती देण्यांत आली आहे. "एक सहकारी" ह्या लेखकानें आपल्या लेखांत खानदेशांतील फळ–विक्री सोसायट्यांची हकीकत सांगितली आहे. ह्या सोसायट्या सर्व नवीनच असल्याकारणानें त्यांचे प्रगतीविषयीं आज विशेष सांगतां येणार नाहीं, परंतु अशा सोसायट्यांस वाव पुष्कळ आहे. त्रैमासिकांतील वरील सर्व लेख वाचनीय आहेत. बाकीचीं नेहमींचीं सदरें अंकांत आहेतच. सहकारी चळवळीशीं निकट संबंध असलेल्या तज्ञांच्या लेखांमुळें क्वार्टर्लीचा अंक नेहेमीच उच्च दर्जाचा असतो; प्रस्तुत अंक त्या लौकिकास साजेसाच आहे.

---

### असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स

वरील संस्थेच्या वार्षिक सभेस ता. १६ डिसेंबर रोजीं कलकत्ता येथें व्हाइसरॉयांच्या भाषणानंतर प्रारंभ होईल.

### वालचंद शेटजींचा विमानांचा नियोजित कारखाना

हा नियोजित कारखाना म्हैसूरचे संस्थानी हद्दींत काढण्यांत येईल, असें समजतें. कॅंटोन्मेंट हद्दींत तो काढण्यांत येणार आहे, असें पूर्वी प्रसिद्ध झालें होतें.

### युद्धपरिस्थिति आणि स्वदेशी धंदे व व्यापार

जुन्यापुराण्या लोखंडी सामानास पोलादाच्या कारखान्यांत मोठी मागणी असते. या कारणानें हिंदुस्थानांतलें मोडींतलें लोखंड व पोलाद ह्यांची निर्गत अलीकडे विलक्षण वाढली आहे. १९३८–३९ सालीं सुमारें ५ लक्ष रुपये किंमतीचें मोडींतलें लोखंड-पोलाद बाहेर गेलें. १९३९–४० मध्यें ही निर्गत सुमारें ७½ लक्ष रुपयांची झाली. चालू सालच्या पहिल्या तीन महिन्यांचे आकडे सुमारें ५२ लक्ष, १० लक्ष व ५१ लक्ष असे अनुक्रमेंकरून आहेत.

* * *

साखरेच्या १९३९ च्या हंगामांत १४५ हिंदी कारखान्यांत १२ लक्ष, ४१ हजार टन इतकी साखर तयार झाली. त्याच्या पूर्वींच्या वर्षांत १३९ कारखाने चालू होते आणि त्यांतील साखरेच्या उत्पादनाचा आकडा ६ लक्ष ५० हजार टन असा होता. १९३८-३९ मधील उत्पादन अत्यंत मर्यादित होतें ह्याचें कारण उत्तर हिंदुस्थानांतील कारखान्यांस त्या हंगामांत पुरेसा ऊस मिळाला नाहीं हें होय. गेल्या वर्षी त्यांस उसाचा पुरवठा अधिक होऊन पूर्वींच्या सालापेक्षा सुमारें ९० टक्क्यांनीं साखरेचें उत्पादन वाढलें. १९३९-४० मध्यें एकूण १ कोटि, ३१ लक्ष टन वजनाचा ऊस कारखान्यांत गाळला गेला. १९३८-३९ मध्यें हा आकडा ७८ लक्ष टन एवढाच होता. १९३९-४०मध्यें उसापासून साखरेचा उतारा ९.४५ टक्के पडला; पूर्वींच्या सालीं उताऱ्याचें प्रमाण ९.२९ इतकें होतें.

* * *

संयुक्त प्रांतांतील औद्योगिक व व्यापारी खात्याच्या डायरेक्टरांनीं कानपूर येथें एक व्यापारी व वस्तुसंग्रहालय स्थापण्याचें ठरवलें आहे. त्यामध्यें प्रांतांत तयार होणारा माल ठेवण्यांत येईल. त्यांच्याशीं ज्यांची स्पर्धा होणार नाहीं असा परप्रांतीय माल ठेवण्याची व्यवस्था पुढें करण्याचा त्यांचा विचार आहे.

### दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

वरील बँकेचें वसूल भांडवल २० हजार रुपये असून तिच्या रिझर्व्ह फंडांत १५ हजार रुपये, बिल्डिंगफंडांत ९½ हजार रुपये, इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत २४ हजार रुपये, डिव्हिडंड तरतूद फंडांत १½ हजार रुपये, बुडीत व संशयित कर्जफंडांत ५६ हजार रुपये, ह्याप्रमाणें रकमा आहेत. बँकेजवळ १४½ लाखांच्या ठेवी आहेत. बँकेजवळ रोख व इतर बँकांकडे मिळून सुमारें २ लक्ष ७९ हजार रुपये शिल्लक आहे. रोखे व शेअर्समध्यें ४ लक्ष, ९१ हजार रुपये आहेत. बँकेनें ७१ हजारांची कॅशक्रेडिट्स व ५ लक्ष, ७७ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. इमारतींत सुमारें १० हजार रुपये गुंतलेले आहेत. ३० जून १९४० अखेरच्या वर्षाचा १९,८५० रुपये नफा वाटणीसाठी उरतो, त्यांतून ५ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत, ९½ हजार रुपये बुडीत व संशयित कर्जे फंडांत, वगैरे प्रमाणें रकमा टाकाव्या व हजार रुपयांचा विनियोग डिव्हिडंड वाटणीकडे ( १० % ) करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. संशयित येण्याच्या वसुलीची तजवीज चालू आहे. बँकेकडील ठेवींत सालोसाल वाढ होत आहे, हें जनतेच्या बँकेवरील विश्वासाचें निदर्शक आहे. बँकेचें खेळतें भांडवल तिच्या भाग-भांडवलाचे मानानें कितीतरी पट आहे, त्यामुळें बँकेस सध्यासारख्या मंदीच्या दिवसांतहि चांगलें डिव्हिडंड देणें सहज शक्य होतें. बँकेची वार्षिक सभा ता. २७ १०.४० रोजीं आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( ,, सातारा ) | १७ विरमगांव ( ,, अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( ,, ,, ) | १८ धुळें ( ,, प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( ,, ,, ) | १९ दोंडाईचें ( ,, ,, ) |
| ५ तासगांव ( ,, ,, ) | २० शिरपूर ( ,, ,, ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( ,, ,, ) | २१ शहादें ( ,, ,, ) |
| ७ शिराळें ( ,, ,, ) | २२ नंदुरबार ( ,, ,, ) |
| ८ कोरेगांव ( ,, ,, ) | २३ साक्री ( ,, ,, ) |
| ९ वाई ( ,, ,, ) | २४ शिंदखेडें ( ,, ,, ) |
| १० अहमदनगर ( ,, अहमदनगर ) | २५ सलोदें ( ,, ,, ) |
| ११ शेवगांव ( ,, ,, ) | २६ मालेगांव ( ,, नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( ,, ,, ) | २७ सटाणा ( ,, ,, ) |
| १३ भिवंडी ( ,, ठाणें ) | २८ कळवण ( ,, ,, ) |
| १४ पालघर ( ,, ,, ) | २९ दोहद ( ,, पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( ,, ,, ) | ३० कालोल ( ,, ,, ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ओरिएंटलचें मूल्यमापन

ओरिएंटल ही हिंदी आयुर्विमा कंपन्यांत फार जुनी व मोठी कंपनी आहे. श्री. वैद्यनाथन् हे या कंपनीचे विमागणिति असून त्यांनीं कंपनीचें ३१ डिसेंबर, १९३९ अखेरचें मूल्यमापन केलें आहे, तें अनेक दृष्टींनीं उद्बोधक आहे.

विमा कंपनी जितकी जुनी तितका तिचा अनुभव अधिक व ती जितकी मोठी तितका तिच्या कार्याचा पसारा अधिक हें उघड आहे. श्री. वैद्यनाथन् यांच्या रिपोर्टात ओरिएंटलच्या विमेदारांच्या मृत्यूचे गेल्या ७० वर्षांचे तुलनात्मक आकडे दिले आहेत. १८७४–९७च्या कालमानांत ओरिएंटलच्या विमेदारांच्या मृत्यूचा आकडा १,००० धरला तर १८७४–१९०२ च्या कालमानांत विमेदारांचा मृत्यू–आकडा १,१२२ वर जातो. मृत्यूचें प्रमाण अधिक पडण्याचें कारण १९ व्या शतकाच्या असेरीस मुंबई प्रांतांत उद्भवलेला प्लेग होय. १८७४–१९१३ मध्यें मृत्यूंचा आकडा १,०८९ येतो. हा आकडा कालमर्यादेंतील दुसऱ्या आकड्यापेक्षा कमी असला तरी पहिल्यापेक्षा जास्तीच आहे. १९०५–१९२५ हा चवथा काल-खंड. यांत मृत्यूचा आकडा ९३२ आहे. १९१८–२० सालच्या इन्फ्लुएंझाच्या सांथीनें हिंदुस्थानांत एकूण ६० लक्ष लोक बळी पडले. त्याचा मृत्यूचे प्रमाणांवर प्रतिकूल परिणाम झाला तरी पहिल्या काल–खंडांतील मृत्यूंच्या आकड्याहून तो कमी आहे.

१९२५–३५ करितां आलेला मृत्यूंचा आकडा ६२७ आहे. हिंदुस्थानांतील एकंदर आरोग्य व साधारण आर्थिक स्थिति सुधारल्यामुळें मृत्यूंचा वरील आकडा कमी झाला आहे; तसेंच १९२१–३१ च्या काल–खंडांतील मृत्यूंचा आकडा १८९१ च्या मृत्यूंच्या आकड्याबरोबर आला आहे असें श्री. वैद्यनाथन् यांनीं म्हटलें आहे.

१९३७–३९ च्या मूल्यमापनाकरितां धरलेल्या ओरिएंटलच्या विमेदारांच्या अपेक्षित मृत्यूंशीं प्रत्यक्ष मृत्यूंचें प्रमाण ४७·८% पडलें. १९३४–३६ मध्यें हें प्रमाण ५२·२% पडलें होतें. यांत महत्त्वाची गोष्ट अशीं कीं, १९३७–३९ मध्यें कंपनीवरील जोखमीचें प्रमाण वाढलेलें असूनहि मृत्यूचें प्रमाण कमी झालें आहे.

कंपनीच्या विमाखातीं फंडांवर १९३८ व १९३९ मध्यें ४½% व्याज सुटलें. यावरून हिंदुस्थानांतील बाजारांत किती मंदी आहे याची कल्पना येते. कंपनीच्या ॲक्चुअरीनें १९३७-३९ चें त्रैवार्षिक मूल्यमापन ३½% व्याजाच्या दरानें केलें असून ते ह्या पूर्वीच्या मूल्यमापनाच्या दरापेक्षां ½% नीं कमी आहे. जागतिक अनिश्चित परिस्थिति, बाजारमंदी व भविष्य कालाबद्दलची अनिश्चितता या कारणसमुच्चयामुळेंच वरील धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. हयातीच्या विमापॉलिसीवर दर हजारीं १५ रुपये व मुदतीच्या पॉलिसीवर दर हजारीं १२ रुपये बोनस त्रैवार्षिक मूल्यमापनांत जाहीर करण्यांत आला आहे.

हिंदी विमाक्षेत्रांत ओरिएंटल ह्या आघाडीवर असलेल्या कंपनीच्या पसाऱ्याचे १९३७-३९ चे पुढील आकडे उद्बोधक आहेतः—

ह्या मुदतींत १,४८,५८१ विमा-पत्रकें देण्यांत येऊन २७,४७,८८,९८३ रुपयांचे विमे उतरविण्यांत आले. त्यावर मिळणाऱ्या वार्षिक हप्त्यांची रक्कम १,५३,५३,८६० रुपये होते. वरील कालांत १,३०,००० रुपयांची सर्वांत मोठ्या रकमेची एक पॉलिसी कंपनीनें दिली. १९३७-३९ च्या तीन वर्षांच्या कालांत कंपनीचें प्रिमिअमचें उत्पन्न १०,४४,४४,९६४ रुपये व व्याजाचें उत्पन्न २,९३,९५,८०२ रुपये मिळून एकूण उत्पन्न १३,३८,४०,७६६ रुपयांचें झालें.

कंपनीच्या खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण २२·५% पडलें. कंपनीनें १,८२,९९,४७२ रुपयांचे मृत्यू–क्लेम्स व २,३३,२६,२३५ रुपयांचे मॅच्युरिटी–क्लेम्स दिले. कंपनीचे रिझर्व्ह, लाईफ वगैरे फंड आतां २५,२७,७६,६५४ रुपयांचे आहेत.

## चालू युद्ध टळलें असतें काय?

### इंग्लिश खाडीखालून बोगदा

१३७ वर्षांपूर्वी नेपोलियननें फ्रान्स व इंग्लंड जोडण्याच्या उद्देशानें इंग्लिश खाडीखालून बोगदा खणण्याची योजना आखली. १९१८ मध्यें दोस्त सैन्याचा सर सेनापति मार्शल फोक यानें, हा इंग्लिश खाडीखालील बोगदा असतां तर तेव्हांचे महायुद्ध झालेंच नसतें असे उद्गार काढले. १९४० सालीं ह्या उद्गारांची आठवण होणें स्वाभाविक आहे.

युद्धाची कुणकुण लागते न लागते तोंच सारें सुसज्ज सैन्य, दारुगोळा व असंख्य ब्रिटिश शिपाई फ्रान्समध्यें उतरूं शकतात. या घटनेच्या शक्यतेनें युद्धाचा वणवाच पेटला नसता असें आज लोक बोलतांना ऐकूं येतें. आजच्या आगबोटी प्रचंड असल्या तरी खाडीखालून मोर्चा करणाऱ्या सैन्याच्या रीघेशीं आगबोटींच्या वहातुकीची कशी तुलना होऊं शकणार? बोगदा खणण्यास लागणारा अलोट पैसा, दीर्घ काल, ब्रिटन-फ्रान्सचे परस्पर राजकीय संबंध आणि दोन्ही देशांतील चंचल लोकमत या कारणसमुच्चयामुळेंच खाडीखालचा बोगदा मूर्तस्वरूपांत आज दिसूं शकत नाहीं.

इंग्लंडनें व फ्रान्सनें पैसा व बुद्धि एकवटून १८७२सालीं बोगद्याच्या प्रत्यक्ष कामास सुरवात केली होती. परंतु पैसा अपुरा पडून तो नाद लवकरच सोडावा लागला. १८८२ मध्यें चॅनेल टनेल कंपनी, साउथ-ईस्टर्न रेल्वे कंपनी व सबमराइन रेल्वे कंपनी या तीन ब्रिटिश कंपन्यांनीं टॉम दि गॅमाँ या फ्रेंच इंजिनिअरच्या सहाय्यानें बोगद्याची कल्पना पुन्हां उचलून धरली. जमिनीच्या खालीं ३५० फूट खोलींखालून बोगदा खणण्याची योजना आखण्यांत आली. वर्षअखेरीस डोव्हरच्या शेजारीं बोगदा खणण्यास सुरवात झाली.

साहसी योजनांना अडचणी भरपूर असतात हा नेहमीचा अनुभव आहे. जनरल वूल्सी व ॲडमिरल हन्स्बे यांनीं या बोगद्यामुळें इंग्लंडवर परराष्ट्रीय संकट कोसळेल अशी भीति प्रगट केली. या भीतीच्या शक्याशक्यतेचा विचार करण्याकरितां एक समिति नेमण्यांत आली. "बोगद्याचा उपयोग चढाई करण्याकरितां करणें शत्रूस अशक्य आहे" असें समितीनें स्पष्ट मत दिलें. तथापि लोकमत गढूळ झालेलें होतें, व त्यास अनुसरून समिति नवीन स्थापन करण्यांत आली. बोगद्याची योजना राष्ट्रसंरक्षणास बाधक आहे, असा अभिप्राय ह्या समितीनें व्यक्त केला व सरकारी हुकुमानें बोगद्याचें काम थांबविण्यांत आलें.

बोगदा करावयाचा झाला तर वीस हजार माणसांना पांच वर्षेपर्यंत काम मिळेल. बोगदा करण्याचा अंदाजी खर्च २७ कोटि रुपये आहे.

# सहकारी संस्थांचे अहवाल

## ग्रामविकास मंडळाचें कार्य

पश्चिम खानदेश ग्रामविकास मंडळातर्फे १५-१०-३९ ते २१-१०-३९पर्यंत साजरा झालेल्या सहकारी सप्ताहाच्या अहवालावरून त्या संस्थेनें केलेल्या उपयुक्त व विधायक कार्याचें स्वरूप स्पष्ट होतें. ह्या सप्ताहांत पुढील कार्यक्रमांचा समावेश करण्यांत आला होता. प्रभातफेऱ्या काढणें, ग्रामसफाई करणें, खताचे खड्डे घेणें, विहिरींच्या आसपास सफाई, मोऱ्या व गटार सफाई, रस्ते दुरुस्ती, वृक्षारोपण दिनाला लावलेल्या झाडांची निगा राखणें, जाहीर सभा, उद्योगधंद्यांचीं प्रात्यक्षिकें, स्फूर्तिदायक पोवाडे म्हणणें, विद्वान् वक्त्यांचीं भाषणें, सदीप व्याख्यानें, जोडधंद्यांची कल्पना देऊन त्यांपैकीं शक्य तीं प्रत्यक्ष करून दाखविणें आणि या सर्व कार्यक्रमांची प्रसिद्धी करणें. लोकमत बनवून सहकारी तत्त्वावर ग्रामीण जीवनाची उन्नति घडवून आणण्याच्या प्रयत्नांत वरील कार्यक्रमाचें स्थान किती महत्त्वाचें आहे हें प. खा. ग्रा. मं. तर्फे भरविण्यांत आलेल्या सप्ताहाच्या यशावरून उघड दिसतें.

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि., जळगांव

वरील बँकेच्या अहवालाचे वर्षअखेर४,७०,३०० रुपयांचें भाग भांडवल वसूल झालें असून ८,२३,२७४ रुपयांचे निरनिराळे रिझर्व्ह फंड आहेत. बँकेकडे ३१,७०,३६७ रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें शेअर्समध्यें व सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या रकमेची मूळ किंमत १२,४०,०११ रुपये आहे. जमीन व इमारत ह्यांत ४२,०३४ रुपये गुंतविले असून ३५,८२,०१० रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. अहवालाचे वर्षाचे शेवटीं बँकेचें ५०,६४,५७२ रुपयांचें खेळतें भांडवल होतें. बँकेला झालेल्या ७४,२१४ रुपयांच्या निव्वळ नफ्यांतून ५% प्रमाणें डिव्हिडंड देण्यांत आलें.

## रेमंड वुलन मिल्स वर्कमेनस् ॲन्ड स्टाफ को. के. सो. लि. ठाणा

वरील पतपेढीचें खपलेलें भाग भांडवल २५,८०५ रुपयांचें असून रिझर्व्ह फंड २,५४७ रुपयांचा आहे. तसेंच सोसायटीकडे १२,६४५ रुपयांच्या ठेवी आहेत. पतपेढीनें कर्जफेडीकरितां व लग्नासारख्या धार्मिक विधीकरितां वगैरे ४४,७७२ रुपयांचीं दीर्घ मुदतीचीं कर्जें दिलीं आहेत. अल्प मुदतीचीं कर्जें ८,५२६ रुपयांचीं आहेत. अहवालाचे वर्षी कार्यकारी मंडळानें ५७५ रुपये कर्जाची फेड ९७८ रुपयांत करून सभासदांना सोसायटीची उपयुक्तता प्रत्यक्ष रीत्या पटवून दिली. २,७०८ रुपयांच्या नफ्यांतून ६¼% प्रमाणें डिव्हिडंड वाटावें असें कार्यकारी मंडळानें सुचविलें. सोसायटीची सभा १८-९-४० रोजीं झाली.

## नंदुरबार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची वार्षिक साधारण सभा

नंदुरबार अर्बन सहकारी बँकेची वार्षिक साधारण सभा श्री. वैकुंठराय ल. मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, मुं. प्रॉ. को. बँक लि. मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ता. १९-९-४० रोजीं नंदुरबार म्युनिसिपल हॉलमध्यें संध्याकाळीं ५ वाजतां भरली होती. सभेस गांवांतील शेठ, सावकार, व्यापारी, बँकेचे सभासद व इतर निमंत्रित मंडळी हजर होती. सभेचे नियमाप्रमाणें अहवालवाचन, कार्यकारी मंडळाची निवडणूक वगैरे कामें झाल्यावर अध्यक्षांनीं भाषण केलें.

### श्री. वैकुंठराय मेहता यांचें भाषण

अध्यक्षांनीं बँकेच्या चालू परिस्थितीबद्दल व निरनिराळ्या गोष्टींबद्दल विवेचन करून तिचे कामकाजांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं अंगिकाराव्या लागणाऱ्या गोष्टींचाहि उहापोह केला. शिवाय बँकेनें स्वावलंबनानें व सहकाराच्या खऱ्या अर्थानें कामकाज योग्य तऱ्हेनें चालविलें तर या इलाख्यांतील इतर ठिकाणच्या अर्बन बँकांप्रमाणें ह्याही बँकेची भरभराट होण्यास प्रत्यवाय नाहीं असें सांगितलें. त्यांनीं बँकेच्या सभासदांस, भांडवलाचे बाबतींत प्रॉव्हिन्शिअल बँकेवर न विसंबतां निरनिराळ्या प्रकारच्या ठेवींच्या रूपानें स्वतःचें भांडवल जमविण्याचा उपदेश केला व बँकेला हुंडीचा व्यवहार, मालाचे तारणावर कर्ज देण्याची व्यवस्था, सोन्या चांदीच्या दागिन्यावर उचल देणें, वगैरेसारख्या धंद्याच्या क्षेत्रांत कामकाज करतां येण्यासारखे आहे असें सांगितलें. या सर्व प्रकारच्या बाबतींत प्रॉव्हिन्शिअल बँक प्रतिस्पर्धी संस्था म्हणून न वागतां या बँकेशीं सहकार्यानें वागून तिच्या कामांत तिला उत्तेजन देईल असें त्यांनीं आश्वासन दिलें. सहकारी बँक व जॉइन्ट स्टॉक बँक यांच्यामधील फरक विशद करून सांगून अध्यक्षांनीं व्यापारी वर्ग व भांडवल गुंतविणारा वर्ग यांना बँकेशीं सहानुभूति बाळगून सहकारीचें कार्य आणखी वाढविण्याबद्दल कळकळीची विनंति केली. कारण, असें करण्यानें बँकेच्या भांडवलापासून होणाऱ्या फायद्याचें फळ या शहरांतील भांडवल गुंतविणारे व कर्ज घेणारे अशा दोन्ही वर्गांना मिळण्यासारखें आहे. या आशयाचें विचारपरिप्लुत असें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर आभार प्रदर्शन होऊन सभेचें काम संपलें.

## पुरंदर तालुका को. सु. यु. लि. सासवड

वरील युनिअनचें कार्यक्षेत्र पुरंदर तालुका असून त्यांत सामील झालेल्या शेतकी क्रेडिट सोसायट्यांची संख्या २८ आहे. "सोसायट्यांचे थकबाकीच्या प्रमाणावर ऑडिट वर्ग देण्याच्या सहकारी खात्याच्या नवीन धोरणामुळें बऱ्याच सोसायट्या ड वर्गांत दिसत असल्या तरी १९३८–३९ वर्षापेक्षां कांहीं जास्त सोसायट्या वरच्या वर्गांत दिसत आहेत" असें अहवालांत म्हणलें आहे. अहवालाचे वर्षी किकवी व टेकवडी या सोसायट्या युनियनमध्यें सामील झाल्या आहेत.

## जुन्नर तालुका शेतकी सुधारणा संघ

वरील संस्थेची ता. २७-९-४० रोजीं वार्षिक साधारण सभा भरून त्यांत श्री. वा. ह. डुण्णू, बी. ए., एलएल. बी., वकील ह्यांची अध्यक्ष व श्री. रा. ह. चिंडप ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. श्री. बाबुराव भी. पुरवंत हे सेक्रेटरी आहेत.

## मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### लासलगांव उपशाखा

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या लासलगांव उपशाखेचा उद्घाटन समारंभ ता. १७-१०-१९४० रोजीं सदर बँकेचे चेअरमन श्री. रा. रा. आर. जी. सरय्या यांना कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें हजर न राहतां आल्यामुळें श्रीमंत सरदार भय्यासाहेब विंचूरकर यांचे हस्तें लासलगांव (जि. नाशिक) येथें पार पाडण्यांत आला. प्रारंभीं ईशस्तवन व स्वागतपर पद्यें झाल्यावर मालेगांव शाखाकमेटीचे चेअरमन श्री. बी. एस. हीरे, बी. ए., एल. बी. एम. एल. ए., मालेगांव यांनीं उपस्थित पाहुणे मंडळींचें हार्दिक स्वागत केलें व अध्यक्षस्थान श्रीमंत सरदार भय्यासाहेब विंचूरकर यांनीं स्वीकारावें अशी सूचना करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. रावबहादूर वंडेकर (डायरेक्टर, मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक) यांनीं सूचनेस अनुमोदन देऊन श्रीमंत सरदार विंचूरकर यांची सहकारी चळवळींतील कामगिरी निवेदन केली.

अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर समारंभाचे नियोजित अध्यक्ष श्री. रा. रा. सरय्या यांनीं पाठविलेलें लेखी भाषण उपशाखेचे कॅशिअर रा. कासार यांनीं वाचून दाखविलें. नंतर स्थानिक व्यापारी व शेतकरी मंडळीपैकीं पुढारी मंडळींनीं बँकेच्या चालकांचे आभार मानून, बँकेस सर्व प्रकारचें सहाय्य करणेचें अभिवचन देऊन बँकेची व्यापारी वर्गास देखील चांगली मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. नंतर श्री. रा. रा. प्रधान रिकन्स्ट्रक्शन ऑफिसर नाशीक यांनीं बँकेविषयीं आपली कल्पना व त्याची सहकारी उद्योगधंदे यांचे वाढीस असलेली जरूरी याचें सोप्या भाषेत विवेचन करून स्थानिक मंडळींत असलेला सर्वसाधारण बँकेविषयींचा गैरसमज दूर करून या बँकेची उपयुक्तता पटवून दिली.

श्री. रा. रा. जाधव असिस्टंट रजिस्ट्रार धुळें यांनीं शेतकऱ्यांना उद्देशून मुद्देसूद व परिणामकारक भाषण केलें. "शेतकऱ्यांनीं आतां आपला अनाठाई होणारा खर्च बंद करून आपलें उत्पन्न वाढविणेची शिकस्त केली पाहिजे. खुल्या धार्मिक आचारांत व वेडगळ सामाजिक चालीरीतीमुळें होणारा खर्च थांबविणें व आधुनिक सुधारलेलीं बीं बियाणें व औतें यांचा उपयोग करून उत्पन्नांत भर घालणें कसें शक्य व जरूरीचें आहे" हें त्यांनीं विशद करून सांगितलें. शेवटीं शेतकऱ्यांनीं आपली सर्वांगिण प्रगति करणें किती आवश्यक आहे या मुद्यावर जोर देऊन त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

रावबहादूर वंडेकर यांनीं लासलगांव बँकेची उपशाखा काढणे विषयींची हकीगत सांगून बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता यांनीं या कामीं किती मदत केली हें विशद करून सांगितलें. श्री. वैकुंठराय मेहता व त्यांच्या कामगिरीची माहिती देऊन त्यांनीं लासलगांवला बँक निघाल्याबद्दल तेथील मंडळींचें अभिनंदन केलें.

नंतर बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर रा. वैकुंठराय मेहता हे बोलावयास उठतांच टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांनीं आपल्या गोड भाषेत प्रॉव्हिन्शिअल बँक शेतकरी व व्यापारी यांच्या सेवेस सदैव तत्पर असल्याचें सांगितलें. या बँकेचें धोरण नफा हें नसून सेवा हें आहे व त्या कामीं आमचेकडून प्रत्येकानें सेवा करून घ्यावी अशी विनंति केली. लासलगांव येथें उपशाखा सुरू करणेस तेथील स्थानिक सहकारी कार्यकर्ते, व्यापारी व शेतकरी यांनीं कशी मदत केली हें सांगून विशेषतः तेथील खरेदीविक्रीसंघाचे चेअरमन रा. रा. यशवंत गंगाराम पानगव्हाणे यांनीं उपशाखेचा कांहीं खर्च खरेदीविक्रीसंघांतून देणेंबद्दल कबूल करून जें सहकार्य केलें व येथें उपशाखा उघडणें शक्य केलें त्याजबद्दल त्यांचे आभार मानले. तसेंच श्री. सरय्या येऊं न शकल्यामुळें त्यांनीं खेद व्यक्त करून श्रीमंत सरदार विंचूरकर यांनीं केलेल्या सहकारी कामगिरीचा उल्लेख करून त्यांनीं या भागांत देखील सहकारी चळवळींत भाग घेऊन दीन दुनियेची सेवा करणेची विनंति केली. शेवटीं त्यांनीं अध्यक्षांचे व उपस्थित पाहुणे मंडळींचे आभार मानले.

अध्यक्षसाहेबांनीं बँकेचें उद्घाटन केल्याचें जाहीर करून व बँकेची उत्तरोत्तर भरभराट होवो असा आशिर्वाद देऊन बँकेकडून जनतेची अधिकाधिक सेवा घडो अशी आशा व्यक्त केली.

नंतर नाशिक भाग सिनियर इन्स्पेक्टर श्री. पुरोहित यांनीं आभार मानून अध्यक्षांना हार-तुरें अर्पण करून सभेचें काम संपविलें.

अल्पाहारानंतर सर्व पाहुणे मंडळी बँकेचे ऑफिसांत गेली तेथें सरदार विंचूरकर यांनीं आपलें पहिलें खातें उघडून तेथील खरेदीविक्रीसंघाचे रु. १०० चे २० भाग विकत घेतले.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचांचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि

**बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी

लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

### इस्लामपूर अ. को. बँक लि., इस्लामपूर

अहवाल, सालअखेर वरील बँकेच्या पटावर ११२ सभासद असून भांडवलाची वसूल रक्कम ६,१५० रुपये आहे. बँकेकडे वर्षअखेर असलेल्या ठेवीची रक्कम १०,२५२ रुपये होती. बँकेचा रिझर्व्ह फंड ८३० रुपयांचा असून इतर फंडांची रक्कम ६१८ रुपये आहे. साल अखेर कर्जाची येणे रक्कम १७,६०२ रुपये आहे. व्याजाची वसुली वेळेवर न झाल्यामुळें व थकबाकीचें प्रमाण वाढल्यामुळें बँकेला अहवालाचे सालीं तोटा झाला. तथापि बँकेची स्थिति मजबूत आहे असें अध्यक्षांनीं अहवालांत नमूद केलें आहे.

---

### पंढरपूर माध्यंदिन ब्राह्मवृंद अ. को. बँक लि., पंढरपूर

वरील बँकेचें अहवाल सालअखेर ७,४६०रुपयांचें भांडवल १६४ भागीदारांत खपलेलें आहे. सालअखेर ५०,३०० रुपयांच्या ठेवी बँकेकडे होत्या. बँकेनें अहवालाचे वर्षांत ३१७रुपयांचीं नवीन कर्जे दिलीं. थकबाकीचें प्रमाण गेल्या वर्षी ४३.९% होतें तें अहवालाचे वर्षी २९.१% वर आलें. बँकेला अहवालाचे वर्षी ४२७ रुपयांचा नफा झाला. वार्षिक सभा २०-१०-४० रोजीं झाली.

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेसंबंधीं "अर्थ"च्या ता. १६ चे अंकांत प्रसिद्ध झालेला मजकूर खालील प्रमाणें त्यांत दुरुस्ती करून वाचावाः—

रिझर्व्ह फंड : ३५,५२१ रुपयांचे ऐवजीं ३५,५२१ रुपये पाहिजे. निवळ नफाः ११,२७२ रुपयांचे ऐवजीं ११,२९१ रुपये पाहिजे. डिव्हिडंडः ४% ऐवजीं ६% पाहिजे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,११,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी (मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. केराई.

### करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जाते. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.




## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं




STEVENS CO. CROMWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा तसाच आवाज होतो. त्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. त्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू त्यापासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. ११ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. आणि १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह. पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा पदार्थ बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी

पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११२—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९१—४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—६ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९१—० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९५-१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१-६१) ... ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३५—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३८—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५३०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ३½% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२९—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४०१—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५६५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | १००५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७८०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५० ) ७ रु. ... ... ... | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४६—० |
| शिंदया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३९—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६-१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४३—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३४५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १७५२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १२४—४ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१२-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२-१२-६ |


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर-Amritsar.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
वंचाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.